सिनेसामायिक

अर्धवट 'काश्मीर फाईल्स'

कलीम अजीम

मार्च महिन्याच्या प्रारंभी दोन चर्चित चित्रपट प्रदर्शित झाले. त्यात पहिला, मराठी दिग्दर्शक नागराज मंजुळे यांचा हिंदीपट 'झुंड' होता; तर दुसरा विवेक अग्निहोत्रीकृत 'काश्मीर फाइल्स'. 'झुंड' सवर्ण-अभिजन विरुद्ध मागास जाति-समुदायाच्या अस्तित्त्वाच्या प्रश्नाशी झगडत सांस्कृतिक संघर्षावर भाष्य करतो. तर दुसऱ्या सिनेमात अभिजन अर्थात काश्मिरी ब्राह्मणांच्या विस्थापनाची चर्चा आहे.

'झुंड'चे सोशल मीडिया रिव्ह्यू अभिजनाच्या सांस्कृतिक वर्चस्ववादावर भाष्य करणारे होते. त्यामुळे अभिजन अर्थात जोशी, देशपांडे, कुलकर्णी आडनाव असलेली सोशल मीडिया यूजर 'झुंड'वर जातिआधारित बहिष्कार घालण्याची घोषणा करताना दिसली. त्यांचा आरोप होता की, सिनेमात गरज नसताना सवर्णांना शत्रू ठरवलं गेलं आहे. हा गट उघडपणे 'झुंड' पाहू नका म्हणत दर्शकांना ब्राह्मणांचं उदात्तीकरण करणारा

लेखक पुणेस्थित असून मुक्त पत्रकार आहेत.

ईमेल- kalimazim2@gmail.com

'पावनखिंड'सारखा पर्याय देताना दिसला. विरोधी गटदेखील तेवढाच आक्रमक झाला. साहजिकच आठवडाभर दलित विरुद्ध ब्राह्मण सांस्कृतिक संघर्षावर झुंज पेटली. दुसऱ्या शुक्रवारी 'काश्मिर फाइल्स' आला, तशी ब्राह्मणांच्या उदात्तीकरणाची चर्चा ब्राह्मणाच्या 'व्हिक्टिमहूड'वर येऊन ठेपली.

एक सिनेमा झुंडीचं टीम (समूहात)मध्ये कसं रुपांतरण करायचं, याचा संदेश देतो; तर दुसरा चित्रपट समूहाला उन्मादी झुंडीत बदलवण्यासाठीचा खटाटोप करतो. 'झुंड' वर्ग, जात किंवा धर्माच्या पलीकडे जाऊन समाजाला समजून घेण्याची भाषा करतो; तर काश्मिर फाइल्स दर्शकांना जात-धर्माच्या विद्वेषी चौकटीत बंदिस्त करू पाहतो.

लेखाचा विषय 'काश्मिर फाईल्स' असल्याने 'झुंड'ची चर्चा इथं फक्त दोन वेगवेगळ्या दृष्टिकोनामधील फरक दर्शवण्यापुरती दिलेली आहे. 'काश्मिर फाइल्स'ची संपूर्ण समीक्षा सिनेमाच्या एका संवादातून केली जाऊ शकते. तो असा, 'झुठी खबर को दिखाना जितना बड़ा गुनाह नही, जितना सच्ची खबर को छिपाना!'

कुठलाही सिनेमा तयार करताना सर्वप्रथम त्याचा उद्देश व लक्ष्यगट विचारात घेतला जातो. जसे सलमान खानचे सिनेमे शुद्ध मनोरंजक असतात, त्यात स्व-बुद्धी वापरण्यास मुभा नसते. तसे रामगोपाल वर्मांचे सिनेमे एक तर हॉररपट आणि दर्शकांचे दोन-अडीच तास वाया घालवणारे असतात.

संबंधित चित्रपटात केंद्रस्थानी कार्यरत बहुतेक घटक भाजपच्या राजकीय विचारसरणीचे वाहक आहेत. दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री

आणि अभिनेते अनुपम खेर, पल्लवी जोशी, मिथून चक्रवर्ती, चिन्मय मांडलेकर इत्यादी कलावंत भाजपचे प्रवक्ते असल्याप्रमाणे सार्वजनिक आयुष्यात कार्यरत दिसतात. शिवाय भाजपचे प्रधानसेवक नरेंद्र मोदी व त्यांचे मंत्रिमंडळ चित्रपटाच्या प्रमोशन मोहिमेत उतरल्याने 'काश्मिर फाइल्स' सिनेमाचे 'नेमके' उद्दिष्टही जनतेसमोर उघड झालं. कदाचित त्यामुळेच इतिहासात असं प्रथम घडलं असेल की, सिनेमाने दर्शकांमध्ये विचारसरणीच्या आधारावर विभागणी केली.

भाजपचे सगळेच बडे मंत्री व प्रचारक, संवादक व कथित राजकीय विश्लेषक सिनेमा पाहण्यासाठी भारतीय जनतेला भावनिक साद घालत आहेत. भाजप समर्थक मीडियाने कलावंताना घेऊन अनेक प्राइम-टाइम आयोजित केली. इतकंच नाही तर सिनेमाचं तिकिट दाखवा व उत्पादन वस्तू/सेवांवर भरघोस सूट मिळवा, अशी योजनादेखील सुरू झाली. आसामच्या भाजप सरकारने सर्व प्रशासकीय कर्मचाऱ्यांना सिनेमा पाहण्यासाठी अर्ध्या दिवसाची सुटी दिली.

देशभरात सिनेमाच्या प्रमोशनसाठी वेगवगेळ्या क्लृप्त्या आयोजिल्या जात आहेत. काही राज्यांनी करमुक्त घोषित केलं, काही राज्यात तशी मागणी सुरू आहे. केंद्राने जीएसटी हटविला तर आपोआपच चित्रपट देशभर टॅक्स फ्री होईल, मग राज्यांना का सांगत असावेत, असाही प्रश्न पडतो. आधी देशभक्तीपर सिनेमे करमुक्त केले जात, आता मात्र, विद्वेष पसरवणारे विखारी सिनेमे करमुक्त करण्याची भाषा बोलली जात आहे.

सिनेमा 'मास मीडिया'चं एक प्रभावी माध्यम आहे. त्यातून

प्रश्न निर्माणही करता येतात आणि ते सोडवलेदेखील जाऊ शकतात. सिने निर्मिती व दृश्य संकल्पना एक संमोहनशास्त्र आहे. कॅमेरा, दृष्यं व त्या दृश्यात हाताळल्या गेलेल्या साधनांची (टुल्स) एक विशिष्ट भाषा असते. त्याचं एक तत्त्वज्ञान असतं. सिने विश्लेषक समर नखाते यांनी प्रस्तृत लेखकाला पत्रकारितेच्या वर्गात शिकवलं आहे, प्रत्येक चार-पाच सेकंदाचं दृष्य शूट करण्यामागे विशिष्ट उद्दिष्ट व संदेश असतो. सब्जेक्ट व कॅमेरामधलं अंतर, कॅमेरा कुठं व किती सेकंद स्थिर राहील, शोल्डर शॉट, मीड शॉट, हॅण्डी कॅमेरा, टिल्ट डाऊन व टिल्ट अप या कॅमेऱ्याच्या प्रत्येक कृतीमागे दिग्दर्शक सिनेरसिकांच्या मनावर काय बिंबवू पाहतो, याचं शास्त्र दडलेलं असतं.

काश्मीर फाइल्स सिनेमात वरील सर्व घटक सुप्त व उघडपणे कार्यरत झालेले दिसून येतात. चित्रीकरणात अनेक ठिकाणी हॅण्डी कॅमेरा वापरला आहे. म्हणजे हातात कॅमेरा घेऊन अगदी जवळून पात्राचे नाक, डोळे, भूवया, कपाळावरील आठ्या, ओठ व नजरेच्या भावमुद्रा टिपलेल्या आहेत. शिवाय अनेक वेळा कॅमेरा एकाच ठिकाणीदेखील स्थिर राहतो. त्यातून दिग्दर्शकाने प्रेक्षकांना त्या पात्राशी समरस करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येतो. परंतु ज्यावेळी उत्तम आशयकल्पनांची कमतरता असते, त्यावेळी नसत्या ठिकाणी गुरफटावे लागते! काश्मीर फाइल्सच्या बाबतीत यापेक्षा वेगळं काही झाल्याचं जाणवत नाही.

सिनेमा पाहताना व्हॉट्सएप यूनिव्हर्सिटीच्या भाजपभक्त गटातील एखादी दीर्घ पोस्ट वाचून त्याचा दृश्य स्वरूपात अनुभवत

घेतो आहोत, असा भास होतो. कारण गेली काही वर्षे कम्युनिस्ट, गांधी, नेहरू, मुस्लिम, देशद्रोह, विरोधक, जेएनयू आणि काश्मिरच्या बाबतीत जो काही अघोरी व विकृत प्रचार राबविला जात आहे, त्याचं विस्तारित स्वरूप 'काश्मिर फाइल्स'मध्ये पाहायला मिळते. त्यामुळेच अनेक लेखक, समीक्षक, विचारवंत व भाष्यकारांनी चित्रपटाला भडक, प्रक्षोभक, अर्धसत्य आणि सांप्रदायिक घोषित केलेलं आहे.

ह्या सिनेमा निर्मितीचं उद्दिष्ट भारतीय समुदायामध्ये हिंदू विरुद्ध मुस्लिम असा तीव्र संघर्ष उभा करून त्यावर आधारित हिंसेला उत्तेजन देण्याचा दिसतो. त्यामुळे उपयुक्त सर्व घटकांचा भरणा काश्मिर फाइल्समध्ये आढळतो. सिनेमात केंद्रीय पात्र पुष्करनाथच्या तोंडी एक संवाद आहे, बहुतेक समीक्षकांचं त्यावर लक्ष गेलेलं नाही. तो संवाद असा,

उनके आने से पहले हम १०० परसेंट थे। उन्होंने हमे कन्वर्ट किया।

उत्तरादाखल, चरित्रनायकाचा नातू कृष्णा म्हणतो, *कितना ही कमाल का इतिहास रहा हैं आप लोगो का, तो कश्मिरी पंडितों ने अपने आप को कन्वर्ट क्यों किया।*

उत्तरादाखल चरित्रनायक म्हणतो, *आतंक से, सुफीयों के तलवारों से!*

सुफी-संतावर अशा प्रकारचे लांच्छन केवळ संघ-भाजप विचारसरणीचे वाहकच लावू शकतात. असा प्रचार अज्ञानातून होत असता तर त्याकडे दुर्लक्ष करता आलं असते. पण हेतूत: केलेल्या कृतीवर बोट ठेवणं गरजेचं आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक

संघाच्या बौद्धिकात बहुसंख्याकांच्या धर्मांतराचं कारण सांगताना 'तलवार' हा घटक केंद्रस्थानी ठेवला जातो. ही दिशाभूल हेतूत: केली जाते. कारण सामान्य जनांना धर्मांतराचं पूर्ण सत्य कळता कामा नये, असा त्यांचा उद्देश असतो.

वास्तविक, भारतात झालेली बहुतेक धर्मांतरे इथल्या ब्राह्मणी चातुवर्ण्य व्यवस्थेला कंटाळून झालेली आहेत. शूद्र म्हणून दिलेल्या तुच्छ वागणुकीमुळे झालेली आहेत. ही धर्मांतरे हिंदू असलेल्या बहुसंख्य जमातीला मंदिरात प्रवेश नाकारल्याने झालेली आहेत. अर्थातच धर्मांतरे जोर-जबरदस्तीने नव्हे तर स्वेच्छेने झालेली आहेत. स्वामी विवेकानंदांनी लिहून ठेवलं आहे की, या देशातील धर्मांतरे मुसलमान आणि ख्रिश्चन यांनी केलेल्या अत्याचारामुळे नव्हे तर उच्चवर्णियांनी केलेल्या अत्याचारामुळे झाली.

सुफी-संत इथं येण्यापूर्वी भारतीय समाज हा जातिव्यवस्था, उच्च-नीच भेदांनी व पुरोहितांच्या धर्मवर्चस्ववादी जोखडात बंदिस्त झालेला होता. निम्न जाति-समुदायातील मानवास शूद्र घोषित करून त्याला हीन वागणूक दिली होती. अशावेळी सुफी संतानी शोषित-पीडितांना माणूस म्हणून जवळ केले. आदर, एकसारखी वागणूक व समान संधी दिली. जातिभेदात गुरफटलेल्या समाजाला एकात्मतेचा संदेश दिला. त्यांना आपल्या ताटात जेवू घातले. त्यांच्याशी मानवतेचं नातं जोडलं.

सुफी-संतांनी जन कल्याणासाठी सत्कार्य राबवले, आपल्या मृदू वाणीने पीडितांना जगण्याचं बळ दिलं, माणसाला मानव म्हणून सन्मान दिल्याने प्रभावित होऊन भारतात मोठ्या संख्येने

धर्मांतरे झालेली आहेत. सुफी-संतानी धर्मांतरासाठी तलवारीचा वापर केला, हा गैरसमजांना जन्म देणारा शुद्ध खोटारडेपणा आहे.

आज भारतात मुस्लिमांसोबत हिंदूदेखील तेवढ्याच भक्तिभावाने सुफींच्या मजारींना भेट देतात. हजार वर्षे झाली, ही परंपरा आजही अखंडपणे सुरू आहे. जर सुफींनी दहशत माजवून धर्मांतरे घडविली असती तर आज त्यांची दर्गाह-मजारे ओस पडली असती, निर्मनुष्य झाली असती.

आरएसएस वगळता कोणीही अगदी सामान्य हिंदूदेखील म्हणू शकत नाही की, सुफींच्या तलवारीने धर्मांतर घडविले. मुळात सुफींकडे तलवार नसून भिक्षापात्र हे एकच साधन होतं, ज्यातून शिधा संकलित करून ते आपला उदरनिर्वाह चालवित. सुफी निःशस्त्र होते, बलहीन होते. जुलमी राजकर्त्यांच्या विरोधात त्यांनी भूमिका घेतली. केवळ मृदू वाणी हेच लोकांना जोडण्याचं एकमेव साधन त्याच्याकडे होतं. व्हाट्सअॅपला फिरत आलेल्या एका विकृत संवादाचं सिनेमात भडक सादरीकरण केलं आहे. दिग्दर्शकाने शेवटीदेखील नाट्यमय पद्धतीने ह्या संवादाची पुनरावृत्ती केली आहे. अशा खोट्या मिथकांची मांडणी केल्यामुळे सिनेमाबद्दल आक्रोष, संतापाची प्रतिक्रिया येणं साहजिकच आहे.

सिनेमात ऐतिहासिक तथ्यांशी प्रतारणा केल्याचा मोठा आरोप सिनेनिर्मात्यावर आहे. वास्तविक चित्रपट सुरू होण्यापूर्वीच एक मोठा लिखित संदेश झळकतो. ज्यात लिहिलं आहे. सिनेमा वास्तविक घटनेवर आधारित असला तरी त्यात ‘रचनात्मक

स्वातंत्र्य' वापरलं आहे. परंतु या क्रियटिव्ह फ्रीडमला 'खरा इतिहास' म्हणून मांडणी केली जात आहे. अलीकडे इतिहासावर आधारित काल्पनिक कादंबरी लेखनाला इतिहास मानायची पद्धत रुढ झाली आहे. त्याचा हा दोष असावा. त्यासाठी ऑगस्ट २०२१ला 'बॉलीवूड हंगामा'ला दिलेल्या मुलाखतीत कबीर खान यांनी म्हटलं होतं, ऐतिहासिक सिनेमा निर्मितीत केवळ लोकप्रियतेसाठी वापरल्या जाणाऱ्या रचनात्मक स्वातंत्र्यावर आळा घातला पाहिजे. काश्मीर फाइल्स चित्रपटाची टीम वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन हा 'खरा इतिहास' असल्याचं प्रमोशन करीत सुटली आहे. तब्बल २५ हजार (एकांगी) कागदपत्रांची तपासणी करून चित्रपट तयार केला, अशी थापही मारली जात आहे.

काश्मिरी पंडिताची बाजू

सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर सोशल मीडियावर अनेक व्हिडियो मेसेज प्रसारित झाले. ज्यात राजकीय हितासाठी आपल्याबद्दल सिनेमात खोटे नॅरेटिव्ह तयार केल्याचं खुद्द काश्मिरी पंडित सांगत आहेत. शिवाय मध्यवर्ती विषय अतिरंजित व एकांगीपणे मांडण्यात आल्याचा मोठा आरोप त्यांनी केला आहे.

बीबीसीने १६ मार्च रोजी जम्मूच्या जगती टाउनशिपमध्ये राहणाऱ्या काही काश्मिरी पंडिताच्या मुलाखतींचा एक फीत जारी केली आहे. त्यात सुनील पंडिता म्हणतात, *यह पिच्चर बनने से ना मेरी घरवापसी हो सकती हैं, ना मेरे देश का कोई समाधान हो सकता है। ना मेरे जम्मू-कश्मीर का कोई समाधान हो सकता है। १९९० से लेकर आज तक एक पॉलिटिकल टिश्यू पेपर की, तरह*

हमे यूज किया गया और आज भी वहीं हो रहा है। जो दुरिया थी, जिसको हमने पास-पास लाने का काम किया था, इससे (सिनेमा) यह दुरिया और बढेगी।

तर ५५ वर्षीय राजेश टिकू म्हणतात, *मुझे याद हैं, वह १९ जनवरी की, रात थी, मस्जिद से आवाजे आती रही, ये काफिरो, जालिमों कश्मिर हमारा छोड़ दो। वह थे पाकिस्तानी, जो हमारा हमसाया हैं, हम इनके बारें मे बुरा नही सोचेंगे, लेकिन वह भी डर गये, उनको भी उन्होंने डराया, इनको आप ने शरण दिया तो आपकी भी यही हालात होगी।*

शादीलाल पंडिता म्हणतात, *काश्मिरी पंडितो के साथ जुल्म हुआ है। हमे मारा, हमे घसिटा गया। नारे लगते थे की, आप कश्मीर छोड दो। लेकिन इसमे यह भी होना चाहिए था की, कश्मिरी मुसलमान जो हैं, भारतीय हैं, उनको भी मार गया, वह फिल्म में नही दिखाया गया है। मिलिटन्सी के वजह से जो सीख मारे गये उसको जोडा नहीं गया।*

हा चित्रपट म्हणजे २०२४ साठीचा इलेक्शन स्टंट वाटतोय. हे (भाजपवाले) जगभरात जातील आणि म्हणतील की, पाहा काश्मिरी पंडितांवर अत्याचार झाले आहेत असे सांगत पुढे शादीलाल म्हणतात, *आठ साल से बीजेपी की, सरकार हैं, उसे जो करना था उसने नही किया। वह दुसरी सरकारों वह आरोप लगाती थी की, इन्होंने यह नही किया। कहती थी, इन्होंने कश्मिरी पंडितों का उजाड़ा। इस सरकार ने भी आज तक हमारी सुध नही ली। उन्होंने हर जगह पर कश्मिर पंडितों के शोषण को बताया। लेकिन एक भी काम हमारा नही किया।*

समांतर मीडियाने काश्मिरी पंडितांच्या अनेक मुलाखती प्रसारित केल्या आहेत. बव्हंशी काश्मिरी पंडितांनी भाजपला विस्थापनाचा दोष दिलेला आहे. ‘पनून काश्मिर’चे निमंत्रक डॉ. अग्निशेखर यांनी १५ मार्च रोजी दृक्श्राव्य फीत जारी करून भाजपविरोधात भूमिका घेतली. ‘मीडिया व्हिजिल’मध्ये प्रकाशित ह्या फितीत काश्मिरी पंडितांच्या पुनर्वसनाबात भाजप देशाची दिशाभूल करत आहे, असा आरोप त्यांनी केला. त्यांनी म्हटलं, *रोजगार पॅकेज भाजपने नाही तर यूपीए सरकारच्या काळात देण्यात आलेले आहेत. भाजपने पंडितासाठी काहीच केलेलं नाही.*

कलम ३७० रद्द करून भाजपने देशाची दिशाभूल केली, असा आरोप करत त्यांनी म्हटलं, *पाच ऑगस्टला भाजप सरकारने कलम ३७० हटविलं, आम्ही त्याचं स्वागत केलं. पण आजही आम्ही लाखों काश्मिरी ४ ऑगस्टमध्येच जगत आहोत. आमच्यावर त्याचा काहीच फरक पडलेला नाही, काहीच बदल झाला नाही. तुम्ही कायदा बदलला, संविधान बदलले. राज्याचे पुनर्गठन केलं. पण काश्मिरी पंडितासाठी काय केलं? हिच वागणूक राहिली तर आम्ही सर्वजण जगासमोर तुमच्याविरोधात बोलू, तुमच्यावर उघड टीका करू, आतापर्यंत काश्मिरी पंडित तुमचा आदर करत होते, पण आता ते तुम्हाला जगासमोर उघडे करतील.*

अमित शाह १४ मार्च रोजी आठवड्यात लोकसभेच्या बजेट सत्रात बोलताना म्हटलं होतं, *४४,००० काश्मिरी विस्थापित कुटुंबांना दरमहा १३,००० रुपयांची मदत मिळते.* परंतु अग्निशेखर याला दिशाभूल करणारी माहिती म्हणतात, *अमित शहा यांनी*

लोकसभेत काश्मिरी पंडितांबाबत चुकीची आकडेवारी मांडली आहे. मी जम्मूमधील मदत आयुक्तांशी बोलून खात्री केली आहे. त्यांनी रिलीफ कार्डवर सुमारे २२ हजार लोकांची संख्या दिली आहे, ज्यांना मदतीची रक्कम मिळते.

तथ्यांशी छेड़छाड

सिनेमात प्रारंभापासून मुस्लीमद्वेषाचे बीजारोपण केलेलं दिसतं. स्थानिक मुस्लिमांनी पंडिताविरोधात हिंसक कृत्ये केली, असा सिनेमाचा एकूण रोख आहे. वारंवार मुस्लिमांना शत्रूस्थानी लेखलं गेलेलं आहे. पंडितांच्या विस्थापनाला स्थानिक मुस्लिम (आणि दहशतवादी) कसे जबाबदार आहेत, हाच चित्रपटाचा मध्यवर्ती विषय आहे. बलराज पुरी 'कश्मीर : टूवर्ड इंसरजेंसी' पुस्तकात लिहितात, पंडितांच्या स्थलांतराबद्दल काश्मिरी मुस्लिमांनी खऱ्या अर्थाने खेदाची भावना व्यक्त केली आणि आम्हाला विस्थापन थांबवण्याची विनंती केली.

३० वर्षांपूर्वीची इतिहासाची कागदं तपासून पाहिली तर असं दिसतं की, हे विस्थापन केवळ पंडितांचं नाही तर स्थानिक शीख, गैरपंडित व मुस्लिमांचेही झालेलं आहे. शिवाय ह्या संघर्षात हजारोंच्या संख्येने मुस्लिमही मारले गेले. पण सिनेमा काश्मिरी मुस्लिमांच्या व्यथांना स्थान देत नाही. उलट मुस्लिमांनी हिंदूंचं अन्न-पाणी रोखलं असा भ्रामक प्रचार करतो.

अब्दुल माजिद मट्टू यांनी 'काश्मिर इश्यू : अ हिस्टोरिकल परस्पेक्टिव्ह' शीर्षकाचे काश्मीरच्या राजकीय स्थित्यंतरावर भाष्य करणारे एक पुस्तक लिहिलं आहे. १७ ऑगस्ट २०१६ रोजी

त्यांनी 'ग्रेटर काश्मीर' वृत्तपत्रात 'Kashmiri Pandits: An incendiary, venomous narrative' लेख लिहून काश्मिरी पंडिताच्या विस्थापनावर भाष्य केलं आहे. ते लिहितात, एप्रिल १९९०मध्ये, प्रख्यात नागरी स्वातंत्र्य कार्यकर्ते, न्यायमूर्ती व्ही.एम. तारकुंडे यांनी काश्मीरच्या परिस्थितीवर एक अहवाल सादर केला. त्यात त्यांनी लिहिलं, 'हिंदूंना स्थानिक मुस्लिमांकडून पूर्ण सहकार्य मिळालं आहे. मुस्लिमांनी सर्वांना रेशन आणि दैनंदिन वस्तूंचा पुरवठा केला. काश्मीरमध्ये संपूर्ण जातीय सलोखा आहे. ...गैर-मुस्लिमांच्या मालमत्तेची लूट किंवा जाळपोळीची एकही घटना घडलेली नाही.

सिनेमात वारंवार संवाद आलेले आहेत की, स्थानिक मुस्लिमांनी पंडितांच्या महिलांची अब्रू लुटली, त्यांच्यावर अत्याचार केले. परंतु मट्टू या मिथकाला खेदाची बाब म्हणतात. (जगमोहन काळातील) प्रशासकीय समुदायाच्या एका वर्गाने मुस्लिम बांधवांविरुद्ध अपमानास्पद प्रचाराची जुनी रीत वापरली. त्यांनीच पंडिताच्या स्थलांतराचं औचित्य म्हणून लूट, जाळपोळ, बलात्काराच्या कथा रचल्या. पुढे मट्टू यांनी स्थानिक मुस्लिमांच्या वेदना योग्य रीतीने शब्दबद्ध झाल्या नसल्याबद्दल खंत व्यक्त केली आहे.

काश्मिरी पंडितांवर पुस्तकरूपाने ९०० पानांचा दस्तऐवज लिहिणारे अशोक कुमार पांडेय, यांनी १५ मार्च रोजी एक दीर्घ दृक्श्राव्य फीत जारी करून काश्मिरी मुस्लिमांच्या व्यथा-कथांवर भाष्य केलं आहे. शिवाय चित्रपटात मांडण्यात आलेला एकांगी दृष्टिकोन, दिशाभूल करणारी माहिती, मिथ्य कथन आणि

अर्धसत्यावर प्रकाश टाकत निर्मात्याचा खोटारडेपणा उघड केला आहे. या शिवाय काश्मिरी पंडितावर 'अवर मून हॅज ब्लड क्लॉट्स' पुस्तक लिहिणारे राहुल पंडिता यांनीदेखील २०२० सालीच 'काश्मिरी फाइल्स' सिनेमात मिथकीय मांडणी करणार असल्याचा दिग्दर्शकावर आरोप केला होता. ज्यावरून विवेक अग्निहोत्री आणि पंडितामध्ये खडाजंगीदेखील उडाली होती.

विशेष म्हणजे राहुल पंडितांच्या उपरोक्त पुस्तकावर २०२० साली विधू विनोद चोपडा यांनी 'शिकारा' नावाचा एक उत्तम हिंदी सिनेमा तयार केलेला आहे. लेखक व दिग्दर्शक दोन्ही काश्मिर पंडित आहेत. सिनेमात अत्यंत संयत पद्धतीने पंडिताच्या विस्थापनाचा विषय हाताळला आहे. त्यात कुठल्याही प्रकारचं प्रक्षोभक चित्रण आढळत नाही. परंतु संघ-भाजपने त्याचं कधीही प्रमोशन केलं नाही किंवा प्रधानसेवकांनी 'मन की, बात'ही केली नाही.

२०२१च्या बजेट सत्रात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काश्मिरी पंडितांच्या विस्थापनाला काँग्रेसला जबाबदार ठरवलं. शाह म्हणाले, *काँग्रेस काश्मिरी पंडितांचं संरक्षण करू शकली नाही. त्यामुळेच ते विस्थापित झाले.* १४ मार्च २०२० रोजी शाह यांनी पुन्हा याच वक्तव्याची पुनरावत्ती केली.

वास्तविक, ज्यावेळी काश्मिरी पंडितांचं विस्थापन झालं, त्यावेळी केंद्रात भाजपसमर्थित व्ही. पी. सिंग यांचं सरकार होते. सरकारने मंडल आयोगाच्या शिफारसी लागू केल्या होत्या. या शिफारशींमुळे ओबीसी समुदातील अनेक जातींना शैक्षणिक आरक्षणाचा लाभ मिळणार होता. परंतु भाजपने ओबीसींच्या

सवलतींना विरोध करण्याची भूमिका घेतली. भाजपच्या गोटात मागास घटकांना मिळणाऱ्या संधीमुळे अस्वस्थता पसरली होती. स्मरण असावं की, त्याच दरम्यान काश्मिरमध्ये पंडितांचं विस्थापन सुरू होतं. परंतु आज काश्मिरी पंडितांच्या विस्थापनाचं भांडवल करणाऱ्या भाजपला पंडितापेक्षा मंडल आयोगाच्या शिफारशी लागू होऊ नये, याची चिंता अधिक होती.

(उत्तरार्ध पुढील अंकात)

परिवर्तनाचा वाटसरू

वर्गणीचे दर

वार्षिक : ६०० रु., त्रैवार्षिक : १६०० रु.,
दशवार्षिक : ५,००० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वा. व. २०० रु.,
सॉफ्ट + छापील ७०० रु. वरील पत्त्यावर इ मनी ऑर्डर,
चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी.
'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.

'गुगल पे'साठी नंबर : 8888708963

अर्धवट 'काश्मिर फाईल्स'

(उत्तरार्ध)

कलीम अजीम

सिनेमात दाखविलेल्या एका सत्याप्रमाणे काश्मिरचे प्रशासनिक अधिकारी वारंवार दिल्लीत संदेश पाठवित होते. परंतु दिल्लीतून (भाजपचे नेत्यांकडून) त्यांना कोणतेही सहकार्य मिळत नव्हते. त्यावेळी विरोधी पक्षनेते राजीव गांधींनी संसद भवनाचा घेराव केला. त्यानंतर सिंग सरकारने जम्मू-काश्मिरच्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सीमा सुरक्षा दलाची कूमक पाठवली. तोपर्यंत भाजपवाले नुसते मंडल आयोगाच्या विरोधाचा राग आळवत होते आणि तमाशा बघत होते.

त्याचा पुरावा २५ सप्टेंबर १९९०च्या 'हिंदुस्थान' वृत्तपत्राच्या पहिल्या पानावरून मिळतो. पत्राची पहिली बातमी आत्मदाह करून मंडल आयोगाचा विरोध केल्याने एका विद्यार्थ्यांचा मृत्यू, दुसरी बातमी आडवाणींची रथयात्रा सुरू झाल्याची होती. तर तिसरी मोठी बातमी वाजपेयींनी कोर्टाचा निर्णय येईपर्यंत आरक्षण लागू करू नये, अशी घोषणा केल्याची आहे. पुढच्या महिन्यात आडवाणींना अटक झाल्याने भाजपने सिंग सरकारचं समर्थन काढून घेतलं होतं.

यातले अजून एक वास्तव असं की, काश्मिरचे तत्कालीन मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनी पदाचा राजीनामा दिला. (त्यांचेदेखील विकृत चित्रण सिनेमात केलेलं आहे. त्यांना दहशतवाद्यांशी संधान साधणारा नेता म्हणून दिग्दर्शकाने सादर केलं आहे. उमर अब्दुल्ला यांनी दिग्दर्शकाने खोटी माहिती प्रसारित करून दिशाभूल केल्याचा आरोप केला आहे.) त्यानंतर तिथं राष्ट्रपती राजवट लागू झाली. जगमोहन मल्होत्रा नावाचे गृहस्थ तिथं प्रशासक म्हणून पाठविण्यात आले. जगमोहन भाजपचे सक्रिय पुढारी होते. पुढे ते वाजपेयी सरकारमध्ये मंत्रीही झाले. त्यांच्यावर आरोप आहे की, त्यांनी काश्मिरी पंडितांना सुरक्षा पुरवण्याऐवजी विस्थापनाला उत्तेजन दिलं. याचा दुजोरा स्थलांतरित काश्मिरी पंडितांनी 'अल सफा' नावाच्या स्थानिक उर्दू वृत्तपत्राच्या संपादकांना मट्टू यांनी पाठवलेल्या पत्रातून मिळतो.

२२ सप्टेंबर १९९० रोजी पाठवलेल्या ह्या पत्रात मट्टू यांच्यासह सुमारे २३ काश्मिरी पंडित नागरिकांच्या सह्या आहेत. पत्रात त्यांनी स्पष्टपणे लिहिलं आहे की, काश्मिरी पंडित समाजाला जगमोहन तसेच आपल्या समाजातील काही स्वयंभू नेते व इतर स्वार्थी पुढाऱ्यांनी बळीचा बकरा बनविले आहे. हे नाट्य भाजप, आरएसएस सारख्या हिंदू जातीयवादी संघटनांनी रंगवले होते.

भारतीय भांडवलदारांची नजर काश्मिरच्या व्यापारावर आहे, त्यातून सदरील कारस्थान रचलं जात आहे, असं सांगत पुढे लिहिलं आहे,

लेखक पुणेस्थित असून मुक्त पत्रकार आहेत.
ईमेल- kalimazim2@gmail.com

जागतिक समुदायाला खऱ्या समस्येपासून अनभिज्ञ ठेवायचं आणि (भारतीय) व्यापाऱ्यांच्या अभद्र कारस्थानावर पांघरुण घालायची ही कल्पना होती.

हे पत्र के. एल. कौल यांच्या पत्राला उत्तर म्हणून लिहिण्यात आलेलं होतं. कौल यांनी १८ सप्टेंबर १९९० रोजी 'अल सफा'च्या संपादकाला लिहिलं होतं (मट्टू यांनी आपल्या उपरोक्त लेखात हे पत्र दिलं आहे), पंडितांना सांगण्यात आलं आहे की सरकारला काश्मीरमधील एक लाख मुस्लिमांना मारायचं आहे, जेणेकरून दहशतवाद पूर्णतः संपुष्टात येईल. जम्मूमध्ये गेल्यावर पंडितांना मोफत रेशन, घरे, नोकऱ्या इत्यादी देण्यात येणार असल्याचंही सांगण्यात आलं. हत्याकांड संपल्यानंतर त्यांना परत आणलं जाईल, असं त्यांना सांगण्यात आलं. (ग्रेटर काश्मिर, १७ ऑगस्ट २०१६)

बलराज पुरी यांनीदेखील आपल्या 'कश्मीर : टूवर्ड इंसरजेंसी' पुस्तकात जगमोहन यांच्यावर ठपका ठेवला आहे. हिंदू राष्ट्र उभारणीची कथा पंडितांना सांगून त्यांना स्थलांतर करण्यास प्रवृत्त केलं, असं पुरी यांनी लिहिलं आहे. (पृष्ठ, ७०-७१) मट्टू म्हणतात, मार्च १९९०मध्ये 'कमिटी फॉर इंनिशिएटिव्ह ऑन काश्मीर'च्या वतीने खोऱ्यातील पंडितांच्या स्थलांतराच्या मुद्द्यावर उत्तर देताना तत्कालीन मुख्य सचिव आर. के. कपूर म्हणाले, खोरे सोडण्यासाठी पंडितांना वाहने उपलब्ध करून देणं, हे सरकारचं धोरण नसायला पाहिजे होतं. ते तर सरकारी अधिकारी वैयक्तिक करू शकले असते.

चित्रपटात पीएम साहेब असा उल्लेख वारंवार येतो, परंतु त्या पीएम साहेबांचं नाव मात्र उघड होत नाही. शिवाय काश्मिरीयतचा प्रचार राबविणाऱ्या वाजपेयींवर काश्मिर प्रश्न चिघळता ठेवण्यासाठी दोषारोप ठेवण्यात आला आहेत. भाजप समर्थकांकडून प्रथमच अशा रीताने वाजपेयींवर टीका झालेली दिसते.

चित्रपटात अभिनेता चिन्मय मांडलेकरने बिट्टा नावाच्या एका दहशतवाद्याची भूमिका साकारली आहे. परंतु हे पात्र यासिन मलिकचं अधिक वाटतं. कदाचित 'क्रिएटिव्ह फ्रिडम' हणून दिग्दर्शकाने दर्शकांना अंधारात ठेवलं असेल. हेच 'फ्रिडम' घेत असंही दाखवलं आहे की, १९९० साली युवा असलेला बिट्टा २०२० साली त्याच तारुण्यात जेएनयूच्या विद्यार्थी निवडणुकांचं नेतृत्व करतोय! स्मरण असावं की, टेरर फंडीग केसमध्ये तो आणि मलिक २०१९पासून तुरुंगात आहेत.

अर्थात जेएनयूतील विद्यार्थ्यांवर भाजपकडून होत असलेले देशद्रोहाचे आरोप सिनेमातही 'क्रिएटिव्हली' वापरण्यात आलेले आहेत. तसंच तिथले प्राध्यापक देशविरोधी कारवायामध्ये लिप्त असल्याचं नाट्यमयरित्या दाखवलं आहे. एका अर्थाने दिग्दर्शकाने जेएनयू विद्यापीठाला दहशतवादी कृत्याशी जोडलं आहे.

सिनेमात अनेक ठिकाणी तपशिलाच्या असंख्य चुका आढळतात. प्रत्यक्षात घडलेल्या वेगवेगळ्या घटनांना एकाच कथासूत्रात रुपांतरित करून दाखवलं आहे. कलावंत म्हणून अनुपम खेर यांनी अभिनय उत्तम केलेला आहे. परंतु इतर कलावंतांचा अभिनय फारच सुमार व कृत्रिम वाटतो. अभिनेते मिथून चक्रवर्ती प्रशासनिक अधिकाऱ्याच्या भूमिकेत आहेत. त्यांचे वाढते वय पाहता त्यांना दोन-तीनदा अतिरिक्त बढती देऊन त्या पदावर ठेवण्यात आल्याचं दिसतं. अर्थात ते भाजपचे सदस्य (कोब्रा) असल्याने त्यांचं पुनर्वसन करण्यात आलं असावं. पल्लवी जोशी प्राध्यापिकेच्या भूमिकेत खूपच बटबटीत व भडक वाटतात. पहिल्या दृश्यापासून त्यांच्या डोळ्यात संशय व अविश्वास ठासून भरण्यात आलेला आहे.

चिन्मय मांडलेकर यांचे पात्र नैसर्गिक कमी तर स्टिरिओटाइप्ड अधिक वाटते. नायक दर्शनकुमार व्हॉट्सॲप विद्यापीठाच्या माहिती व प्रचार जंजाळात गुरफटलेला युवक शोभून दिसतो. कन्हैय्याकुमारचं पात्र त्याच्या वाट्याला आलेलं आहे. शेवटचं भाषण देताना तो विद्यार्थी नव्हे तर भाजपचा गोदी मीडिया टाईप प्रवक्ता अधिक वाटतो.

सांप्रदायिक धोरण

काश्मिरी पंडितासोबत अन्याय झाला हे उघड सत्य आहे. त्यांच्या व्यथांना अनेक पुस्तके, रिपोर्ट, अहवाल, माहितीपटातून पर्याप्त जागादेखील मिळाली आहे. त्यांचा दहशतवाद्यांकडून झालेला अमानुष छळ आजही चर्चेचा विषय असतो. त्यामुळेच तर त्यांना केंद्रीय व स्थानिक सरकारने निवारा, विविध सवलती, आरक्षण दिलेले आहे.

काश्मिरबाहेर देशात विविध ठिकाणी स्थलांतरित होऊन ते सेटल झालेले दिसतात. पहिली पिढी मात्र स्वगृही परतण्याची आस घेऊन आहे. त्यातील अनेकजण (३,८०० परत गेले असं भाजपनं संसदेत सांगितलं आहे.) परतलेदेखील. परंतु पर्याप्त रोजगाराची साधने नसल्याने अनेकांना परतण्याची इच्छा नाही. नव्या पिढीला खोऱ्याविषयी फारसं आकर्षण नाही. किंबहुना बहुतेकजण शहरी लाइफस्टाइल सोडून काश्मिरला परत जाऊ इच्छित नाहीत.

उदाहरण द्यायचं झाल्यास अनुपम खेर मुंबईची सिने इंडस्ट्री सोडून परत गावी जाऊन शेती करू शकणार आहेत का? ३० वर्षांत संघर्षातून मिळवलेलं सगळं सोडून ते पुन्हा खोऱ्यात कसे जातील? दुसरीकडे केंद्रिय सत्तेनेदेखील काश्मिरींबद्दल योजलेले सैन्य धोरण व विकास धोरणात दाखवलेली औदासिन्यता बरंच काही सांगून जाते.

दुसरीकडे भांडवलदारांचे काश्मिरमध्ये भू-राजकीय संबंध दडलेले आहेत. ३७० कलम हटवून भाजपने भांडवलदारांना तिथं आमंत्रित केलेलं आहे. त्यामुळे बाहेरचे लोंढे काश्मिरमध्ये वाढणार आहेत. तिथल्या नैसर्गिक संसाधनासोबत स्थानिक संस्कृतीपुढेदेखील मोठं आव्हान उभं राहू शकतं. भाजपने देशातील इतर हिंदूना काश्मिरमध्ये वसवण्याचे धोरण आखलेलं दिसतं. त्यातून बाहेरचे व मूलनिवासी असा संघर्ष वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

काश्मिरी पंडितांच्या छळाचं भांडवल करणारा भाजप गेल्या आठ वर्षांपासून सत्तेत आहे. पण त्यांनी पंडिताच्या घर वापसीसाठी काही प्रयत्न केलेले नाहीत. १४ मार्च रोजी लोकसभेत काश्मिर स्थितीवर चर्चा झाली. चर्चेत गेल्या ३१ वर्षांत काश्मिरी पंडितांच्या हत्येचा आकडा खासदार असदुद्दीन ओवैसींनी समोर ठेवला. माहिती अधिकारातून काढलेली माहिती त्यांनी पटलावर ठेवली, ती संख्या ८९ होती. शिवाय अतिरेक्यांनी १,५०० बिगर पंडित हिंदूनाही मारले, त्यांच्याबद्दल कोणी अश्रू का ढाळत नाही, असेही ओवैसी यांनी विचारले.

पंडितांच्या हत्येबाबत वेगवेगळे दावे केले जातात. कोणी १००, २०० तर, कोणी ७०० म्हणतो. परंतु भाजपा सरकारचे गृहमंत्रालय २१९चा आकडा देतो. तर विवेक अग्निहोत्री ४,००० देतात आणि भाजपवाले १ लाख म्हणतात. त्याच काळात २०००पेक्षा अधिक स्थानिक मुस्लिमांना दहशतवाद्यानी मारले, असे लेखक अशोककुमार पांडेय संबंधित पुस्तकात लिहितात.

वास्तविक परिस्थिती देशासमोर येण्यासाठी तपास आयोग स्थापन करण्याची गरज आहे. परंतु केंद्र सरकारने भावनिक राजकारण करण्यापलीकडे काहीच केलेलं दिसत नाही. ओवैसींनी स्वतंत्र तपास आयोग स्थापन करावा, अशी मागणी लोकसभेत त्यादिवशी केली.

वेगवेगळे अहवाल सांगतात की, दहशतवादी हल्ले आणि सुरक्षा रक्षकांसोबत झालेल्या चकमकीत गेल्या ३० वर्षांत लाखभर काश्मिरी नागरिक मारले गेले. पण ह्या निष्पाप नागरिकांबद्दल सरकारकडे संवेदना नाहीत, असं दिसते. फक्त २१९ पंडिताच्या मृत्युबद्दल भाजप-संघ आकांडतांडव करतात. दुसरीकडे 'नेल्ली हत्याकांड' असो वा 'गुजरात दंगली'तील मृत्यूंना खोटं ठरवतात.

काश्मिरी पंडित अमाप सवलती लाटून केंद्रीय प्रशासनामध्ये विविध ठिकाणी सेटल झालेले आहेत. स्थानिक काश्मिरी मुस्लिम मात्र अजूनही छळ सोसत आहेत. बकालपणा, उपेक्षा, बेरोजगारी व आर्थिक दारिद्र्य स्वीकारून न केलेल्या गुन्हाची शिक्षा भोगत आहेत. मट्टू काश्मिरी पंडितांच्या ह्या स्वार्थी वृत्तीवर

बोट ठेवतात. संबंधित लेखात त्यांनी म्हटलं आहे, मागे वळून पाहिल्यास असं दिसून येतं की या समाजाचा दृष्टिकोन नेहमीच संधिसाधू आणि अदूरदर्शी राहिला आहे. ते नेहमीच 'शासक वर्गा'च्या सोबत राहिले आहेत. काश्मीरच्या इतिहासाच्या सध्याच्या टप्प्यात त्यांनी या समस्येकडे आपला सांप्रदायिक दृष्टिकोन पुन्हा एकदा दाखवून दिला आहे.

ते पुढे लिहितात, मुस्लिमविरोधी धोरणांसाठी कुप्रसिद्ध असलेल्या भाजपशी जुळवून घेणे त्यांच्यासाठी वाजवी नव्हते. त्यांनी खोऱ्यातील मुस्लिम नरसंहाराचा अवलंब करणाऱ्या जगमोहन यांना पाठिंबा दिला आणि आज त्यांनी भारतीय मुस्लिमांच्या राजकीय आणि सांस्कृतिक विनाशावर विश्वास ठेवणाऱ्या आरएसएस, विश्व हिंदू परिषद आणि इतर उजव्या विचारसरणीच्या हिंदू गटांना आपला संपूर्ण पाठिंबा दिला आहे.

हिंसेला उत्तेजन

संबंधित सिनेमात 'जिनोसाइड' शब्द वारंवार उच्चारण्यात आलेला आहे. साहजिकच या कृतीचा उद्देश दर्शकांच्या हिंसेला उत्तेजन देण्याचा असावा. अनेक वेळा कॅमेरा काही विशिष्ट घटनांकडे दर्शकांचं लक्ष वेधतो. एक प्रकारे सिनेमांतील काही दृश्ये दर्शकांना हिप्नोटाइज करतात. सिनेमा प्रारंभीपासूनच संमोहनाचं शास्त्र म्हणून काम करतो. त्यातील दृश्ये हिंसा, विद्वेष, तुच्छता आणि तिरस्काराला जन्माला घालतात.

वरवर पाहता हा विषय जेवढा सहज वाटतो तसा नाही. हिंसेला उत्तेजन देण्यासाठी एक नियोजनबद्ध कृती कार्यक्रमाची व तसे मानस घडवण्याची सुप्त तयारी करण्यात आलेली दिसते. शेवटची दहा-एक मिनिटाची दृश्यं खूपच प्रक्षोभक, विकृत व हिंसक असल्याने विचलित करतात. आरा मशिनवर एका स्त्रीला उघडपणे चिरण्यात आलेल्या दृश्यांना सेन्सॉर बोर्डाने परवानगी कशी नाकारली दिली, असा प्रश्न पडतो. २४ लोकांना उभे करून अतिरेकी बंदुकीने शूट करतात हे दृश्य पडद्यावर बघणे असह्य आहे. (वास्तविक अशा दोन घटना घडलेल्या आहेत एक १९९८ साली वंधामा गावात तर दुसरी २००३ साली नादीमार्ग येथे.) कुठलाही मनुष्य ही किळसवाणी दृश्ये पाहू शकत नाही. परंतु निर्मात्याने विशिष्ट हेतू पूर्ण करण्यासाठी ही दृश्ये कोंबली आहेत.

शेवटी लहान मुलाला अतिरेकी मारतात. हा सीन पडद्यावर काही काळ स्थिर ठेवण्यात आलेला आहे. सदरील दृश्य हिंसक भावनांना वाट करून देऊ शकतो. हे चित्रण काश्मिरीच नव्हे तर एकूण मुस्लिमाविरोधात चीड, घृणा निर्माण करते. द्वेष, राग, सूडभावनेला प्रवृत्त करतो. सिनेमा बहुसंख्य समाजात अस्मिता व अस्तित्त्वाचे संकट उभे करतो. मृत्यू व धर्मांतराची अनामिक भीती संबंधित वर्ग घटकांत रुजवण्यास सिनेमाने यश मिळवलं आहे.

हेच कारण आहे की, सिनेमा संपल्यानंतर अनेक ठिकाणी चित्रपटगृहात वादावादी झाली. असे अनेक व्हिडियो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. प्रत्येक व्हिडियोमध्ये दिसतं की, सर्वच ठिकाणी मुस्लिमविरोधी घोषणाबाजी सुरू आहे. मुस्लिमांना चिरडून टाकण्याची, पृथ्वीतलावरून नष्ट करण्याची, त्यांचा वंशविच्छेद घडविण्याची भाषा बोलली जात आहे.

अशाच एका व्हिडियोत एक तरुण उपस्थितांना संबोधित करत म्हणतो, इथं उपस्थित असलेल्या प्रत्येकांनी एका-एका मुस्लिम मुलीशी लग्न करून तिचं धर्मांतर करावं. अशा रीतीने लवकरच आपण मुस्लिमांचं संख्याबळ कमी करू शकू. दुसऱ्या एके ठिकाणी एक माजी सैन्य अधिकारी मुस्लिमांविरोधात हिंसेची भाषा करत उपस्थितांना वांशिक युद्ध छेडण्यास प्रवृत्त करतो.

एरवी अहिंसक असणाऱ्या व्यक्तीलाही हा सिनेमा हिंस्र व रानटी बनवू शकतो. शिवाय समाजात कलह माजविण्यासाठीदेखील कारणीभूत ठरू शकतो. सिनेमा

पाहून अनेक राजकीय नेते पत्रकार परिषदा घेत आहेत, प्रक्षोभक विधाने करीत आहेत. सत्याचा शोध घेणाऱ्यांनी सिनेमा पाहावा, असे विधान मोहन भागवत यांनी केलं. (प्रमोशनसाठी सिनेमा टीमने त्यांची भेट घेतली त्यानंतर त्यांनी हे विधान केलं.) मनोहर भिडे यांनी इस्लाम आणि भारतीय मुस्लिमांविरोधात प्रक्षोभक विधान केलं. अशा स्फोटक वक्तव्यामुळे सांप्रदायिक घटकांना इंधन मिळू शकते.

चित्रपट वेदना, आक्रोश, आक्रंदन व भेदकता मांडण्यात यशस्वी झालेला आहे. परंतु तेवढाच तो अतिशय स्फोटक व तीव्र गतीने हिंसेला प्रवृत्त करणारादेखील झालेला आहे. मानसशास्त्राचा अभ्यास सांगतो की, देश, धर्म, भाषा, वंश या हिंसाचारामागच्या प्रमुख प्रेरणा असतात. संबंधित घटक मानवी मनात अत्यंत उदात्त भावनाही निर्माण करू शकतात तसेच तिरस्कारदेखील प्रसवू शकतात. हिटलरच्या सत्तेत ह्याच घटकाने ज्यू धर्मियांचं निर्वंशीकरण करण्याला बळ दिलं. (त्यानेदेखील आपली क्रूरता लपविण्यासाठी अनेक प्रचारी सिनेमे तयार केले होते. आजही त्याचे समर्थक सिनेमे बनवून हिटलरच्या 'व्हिक्टिमहूड'ची चर्चा करीत असतात. परंतु त्याने हिटलरचा क्रूर इतिहास मात्र बदलू शकला नाही.) ठरवून किंबहुना भारतात केंद्रीय सत्तेने इस्लाम व मुस्लिम विरोधी प्रचार राबवूनच राजकीय सत्ता मिळवली आहे. त्यांनी ह्या विद्वेषी प्रचारात लाखोंच्या संख्येने आपल्या समर्थक गटांना उतरवलं आहे. संबंधित सिनेमा हा त्याच मोहिमेचा एक भाग आहे. भविष्यातही असे सिनेमे काढले जातील व मोदींच्या राजकीय हिंदुत्वाचे पोषण केलं जाईल.

अखेर असं म्हणावं लागतं की, अल्पसंख्याकविरोधात हिंसेला उत्तेजन देण्यासाठी, बहुसंख्य समूहाला उन्मादी झुंडीत रुपांतरित करण्यासाठी तर हा सिनेमा निर्मिला नसावा? सिनेमात मिथून चक्रवर्तीच्या तोंडी एक वाक्य आहे. त्या वाक्यातून सिनेमा एका वाक्यात निकाली काढता येऊ शकतो.

यह एक सिविलायजेशन का वॉर है। भारत की हजारों साल पुरानी सभ्यता के खिलाफ जिहाद हैं...

होय, खरंच बहुसांस्कृतिक भारतीय सभ्यतेविरोधात 'अर्धवट फाइल्स' घेऊन निर्माता, कलावंतांनी पुकारलेलं हे धर्मयुद्ध आहे. हा चित्रपट म्हणजे मुस्लिम समुदायाविरोधात उघडपणे बहुसंख्याकांना भडकावण्याचं एक धारदार शस्त्र आहे. मोदींच्या राजकारणात हिंसा आणि विद्वेष हिंदुवादी राजकारणाचं मूलतत्त्व मानलं जात आहेत. त्या मूलतत्त्वांना हा सिनेमा बळकटी प्रदान करतो, असं खेदाने म्हणावं लागतं.

सिनेमात दाखवलेल्या एकांगी, अर्धवट व अनैतिहासिक माहितीवरून काश्मिरी पंडितांच्या समस्येविषयी मते तयार करणे इतिहासावर अन्याय करण्यासारखे होईल. त्यामुळे वास्तव जाणून घेण्यासाठी या विषयावरील पुस्तके वाचायला हवीत. संबंधित विषयावर शेकडो वस्तुनिष्ठ ग्रंथ उपलब्ध आहेत. लाखो रिपोर्ट, अहवाल, माहितीपट प्रकाशित झाले आहेत. घटनेचं यथायोग्य विश्लेषण करणारे, वास्तवाला भिडणारे, विविध बाजू आणि व्यामिश्रता सांगणारे अनेक संदर्भ उपलब्ध आहेत. ते वाचून, समजून घेऊन सिनेमात मांडलेल्या प्रसंग व घटनांची शहानिशा करता येऊ शकते आणि अज्ञानातून निर्माण झालेल्या हिंसेला वेळीच आवर घालता येऊ शकते.

●

(सौजन्य : कर्तव्य साधना)

परिवर्तनाचा वाटसरू

वर्गणीदारांनी आपला व्हॉट्स ॲप क्रमांक 'परिवर्तनाचा वाटसरू'च्या ९७६३२०६२१२ या व्हॉटस ॲप क्रमांकावर कळवावा. आपल्या सर्व तक्रारींची दखल तातडीने घेतली जाईल.

– सहव्यवस्थापक